सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई यांचे कार्यालय P. F.

जा.क्र. उशिसं/नि.नि.नि./९८३ दिनांक : 05 जानेवारी 2002

Mgmt Contribution

प्रति,

कुलसचिव, मुंबई / एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ

प्राचार्य / आचार्य

सर्व अशासकीय अनुदानीत महाविद्यालये

मुंबई, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग रत्नागिरी

विषय : अंशदायी भविष्यनिर्वाह निधीमधील व्यवस्थापनाच्या हिश्याची रक्कम शासनाकडे भरणा करणेबाबत.

संदर्भ :
1. शासन निर्णय 1. शिक्षण व सेवायोजन विभाग निर्णय क्र. एनजीसी - 1283 (65) एनआय -4 दि. 21-7-1983.
2. क्र. एनजीसी-1284 (928) विशि -4 दि. 18-2-1988
3. क्र. एनजीसी/1293(2460)विशि -4 दि. 26-4-1993
4. क्र. एनजीसी/1297/96890L/(1292)विशि -4 दि. 10-8-1994.
5. क्र. एनजीसी-1793/2560/विशी-4 दि. 22-11-1993.

1. अशासकीय महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना संदर्भाधीन दि. 21-7-1983च्या शासन निर्णयाद्वारे सेवानिवृत्ती योजना लागू करण्यात आली. दि. 1-10-1982 व तदनंतर सेवेत आलेल्यांना त्यांचे पद 100 टक्के अनुदानावर असल्यास आपोआप ही योजना लागू होते. तत्पूर्वी सेवेत असलेल्या व अंशदायी भ.नि.नि. योजना स्विकृत केलेल्या कर्मचाऱ्यांना उपरोक्त दि. 18-2-1983 व 26-4-1993 च्या शासन निर्णयाद्वारे निवृत्तीवेतन योजनेसाठी विहित कालमर्यादेत विकल्प देण्यासाठी मुदत दिली होती ज्यांनी विकल्प दिला त्यांची व्यवस्थापन हिश्याची रक्कम व्याजासह या कार्यालयात जमा करण्याचे वेळोवेळी निर्देश दिले होते. तथापि काही महाविद्यालयांनी सदर रक्कम FDR अथवा अन्य ठेवीमध्ये गुंतविली असल्यामुळे या कार्यालयात भरलेल्या नाहीत. शासननिर्णय 27-11-1987 द्वारे व्यवस्थापनाने ही रक्कम 12 टक्के व्याजासह शासनाकडे जमा करावी असे आदेश दिले होते. ज्यांनी अशी रक्कम भरली नाही त्यांच्याकडून वेतनेतर रकमेतून एकरकमी वसूल करण्याचे आदेश हि त्यात अंतर्भूत होते. ज्यांनी FDR मध्ये रक्कम गुंतविली होती त्यांनीही संबंधित FDR चे रोखीकरण करून सदर रक्कम व्याजासह शासनाकडे जमा करण्याचे निर्देश या कार्यालयाच्या पत्र क्र. उशिसं/सेनि/1210/1289 दि. 2/6/88 द्वारे दिले होते.

2. शासन निर्णय दि. 22-11-1993 द्वारे विना अनुदानित कालावधीतील सेवा ते महाविद्यालय 100 टक्के अनुदानावर आल्यानंतर निवृत्ती वेतन विषयक लाभासाठी धरण्याचे आदेश आहेत. जी महाविद्यालये 1982 नंतर अनुदानावर आली त्यांनी ती 100 टक्के अनुदानावर येण्या पर्यंतच्या कालावधीतील निवृत्ती वेतन दायित्वाची रक्कमही शासनाकडे जमा करावयाची होती. व्यवस्थापन हिश्याची / निवृत्तीवेतन लाभाच्या प्रमाणशीर दायित्वाची रक्कम विहित व्याजासह शासकीय कोषागारात जमा केली नाही तर संबंधित कर्मचाऱ्याला निवृत्ती वेतन विषयक लाभ प्राप्त होत नाहीत. अशा परिस्थितीत संबंधित कर्मचारी / शिक्षक वर्गाला अकारण त्रास सोसावा लागतो.

आपण आपल्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या अंशदायी भ.नि.नि. मधील व्यवस्थापन हिश्याची / प्रमाणशीर निवृत्तीवेतन दायित्वाची व्यवस्थापनाने भरावयाची रक्कम शासन कोषागारात जमा केली असल्याची खातरजमा करून घ्यावी. ही रक्कम जमा केली नसल्यास विहित व्याज धरणे व दंडित व्याजासह रक्कम शासकीय कोषागारात जमा करावी.

ही रक्कम जमा करताना प्रत्येक कर्मचारी निहाय स्वतंत्र करून, परिगणित रक्कम अचूक असल्याची खात्री करून घ्यावी. या बाबतीत आपल्या काही अडचणी शंका असल्यास आपण समक्ष सहसंचालक अथवा संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन शंका निरसन करून घ्यावे अकारण पत्रव्यवहार करू नये.

आपला विश्वासू,

सहसंचालक

प्रती 1) मा. उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
2) मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे